

मुद्रा, सोलापूर प्रकाशित

# आशय ९

दिवाळी

मूल्य रु.५०/-

# जागतिकीकरण : काही विचार

जयंत नारळीकर

खालील उद्धरणापासून ह्या लेखाची सुरुवात करतो -

''दीर्घकाळानंतर आज आपल्याला जगात इतक्या मोठ्या प्रमाणावर द्वेष, पावित्र्यहीनता, अप्रामाणिकता दिसत आहेत. भक्तिभाव नाहीसा झालाय, साधेपणा आणि सरळपणा यांची थट्टा होत आहे आणि न्याय तर नावापुरता उरला आहे. सगळीकडे गोंधळ, किंकर्तव्य - विमूढता दिसते - योजनेप्रमाणे काहीच घडत नाही !''

हे व्यक्तव्य कोणी, केव्हा, कुठे केले ? आजकालच्या एखाद्या प्रवचनकाराने सद्यःस्थितीवर असे ताशेरे ओढल्यास नवल नाही. किंवा एखाद्या संपादकीयात देखील ही वाक्ये खपून जातील.

१५७५ साली लुई ले रॉय ह्या फ्रेंच लेखकाने आपल्या Vicissitude (स्थित्यंतर) नावाच्या पुस्तकात हे लिहिले होते. हे पुस्तक त्या काळी म्हणजे ४३० वर्षांपूर्वी पुष्कळ गाजले होते. त्या काळी युरोपमध्ये पुनरुज्जीवनाचे (renaissance) युग सुरू झाले होते. साहित्य, संगीत, कला यांच्यात नवनिर्मिती चालू झाली होती. चुंबकाचा दिशादर्शक म्हणून शोध लागल्याने खलाशांना समुद्रात दूरवर जाणे सुकर होत होते. पण दूर देशांना जाताना वाटेतली रोगराई (कित्येकदा नवे रोग) स्वदेशी आणली जात होती. मुद्रणकलेच्या विकासामुळे ज्ञानप्रसार वाढला असला तरी प्रस्थापित विचारांविरुद्धची मते पण पसरत होती. बंदुकीच्या दारूच्या शोधामुळे युद्धे अधिक विध्वंसक बनली होती.

ह्या बदलत्या परिस्थितीचे पडसाद सामाजिक जीवनावर उमटत होते. आणि त्यामुळे सर्वसामान्य माणसाच्या मनात अस्थैर्यजनित भीती निर्माण झाली होती. दूरचे प्रवास, विचारांची देवाणघेवाण, वाढते संघर्ष आदींमुळे जनमानसात खळबळ निर्माण होत होती जिचे वर्णन ले रॉयच्या लेखनात आहे.

जागतिकीकरणाच्या या युगात अशीच खळबळ आजच्या समाजात निर्माण होणे साहजिकच आहे. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीने आज जगाचे कानेकोपरे एकत्र आणले आहेत. विस्तारणाऱ्या विमानसेवेमुळे लोकांना दूरदूरच्या सहली आखणे सोपे झाले आहे. अशा परिस्थितीत 'अर्थशास्त्रीय अंतरे' देखील संकुचित होणे स्वाभाविक होते.

अर्थात कुठल्याही नाण्याला दोन बाजू असतात. जागतिकीकरणाचे देखील धनात्मक तसेच ऋणात्मक पैलू आहेत. जागतिकीकरणामुळे बाजारपेठा रुंदावतात आणि त्या क़ाबीज करताना, ती करणाऱ्याला आपल्या सक्षमतेची पातळी उंचावावी लागते. म्हणून ह्या मार्गाने गेल्यास योग्य तो जगेल ह्या न्यायाने योग्यता वाढवायला प्रोत्साहन मिळते; ही झाली धनात्मक बाजू. त्याउलट कुठल्याही समाजातल्या दुर्बल घटकांना ह्या चढाओढीत दुर्लक्षिले जाते. म्हणून सामाजिक कल्याणाकडे लक्ष न देता केवळ निवडक व्यक्तींना वा समूहांना जागतिकीकरणाचा फायदा मिळतो. अशा स्थितीत भारतासारख्या नवोदित किंवा नवोदयाकडे वाटचाल करणाऱ्या देशाने काय करावे ? युरोप-अमेरिका-जपानसारख्या सधन देशांना जागतिकीकरण परवडेल पण भारतासारख्या 'गरीब' देशाला ते हानिकारक ठरेल असा एक मतप्रवाह आहे. मला त्यात आणि ले रॉयच्या उद्धरणात बरेच साम्य वाटते. वास्तविक आपल्या पुस्तकात ले रॉयने घडू पाहणाऱ्या स्थित्यंतराचे स्वागतच केले होते. नवनिर्मितीच्या प्रसूतिवेदना असतातच. त्या सहन करून पुढे गेले तर तत्कालीन समस्यांवर तोडगे निघतील असा आशावाद त्याने व्यक्त केला होता. आपल्याला जागतिकीकरणाकडे अशाच आशावादी दृष्टिकोनातून पाहायला शिकले पाहिजे.

एकीकडे जागतिकीकरणामुळे पाश्चात्त्य संस्कृतीचे आर्थिक आक्रमण होत असते. थम्स अप जाऊन कोक-पेप्सी येतात. शहरातल्या प्रमुख ठिकाणी मॅक्डॉनल्ड - पिझ्झा

हट - केंटकी फ्राइड चिकन आपापले 'जंक फूड' आकर्षक पद्धतीने मांडतात. बुटांची महागडी दुकाने अवतरतात. जंक फूडमुळे लठ्ठपणा येतो आणि हा 'रोग' पाश्चात्त्य देशात वाढत आहे. हे एक उदाहरण झाले. एकंदरीत पाश्चात्त्य संस्कृतीतला विलासी आणि खर्चिक माल भारतात अधिकाधिक स्वरूपात येत आहे. त्याचप्रमाणे 'इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट'मुळे औषधांच्या किमती वाढत आहेत.

परंतु हा ओघ एकमार्गी राहण्याचे कारण नाही. चीनसारख्या प्रगतीशील देशाने स्वस्तमालाचा डोंगर उभारून पाश्चात्त्य बाजारपेठा काबीज करायला सुरुवात केली आहे. 'आउट-सोर्सिंग'च्या नावाखाली अनेक पाश्चात्त्य कंपन्यांसाठीचा माहिती पुरवठा भारतातून भारतीयांतर्फे होत आहे. ही दोन उदाहरणे बोलकी आहेत कारण हे आक्रमणाचे प्रकार जागतिकीकरणामुळे शक्य झालेत व प्रगतीशील देशांकडून होणारी अशी आक्रमणे कशी थोपवावीत ही पाश्चात्त्य देशांत चिंतेची बाब होत आहे.

मला स्वतःला असे वाटते की जागतिकीकरणामुळे येणाऱ्या आव्हानामुळे सामान्य भारतीयाला स्वतःची कार्यक्षमता वाढवणे अपरिहार्य ठरेल. समाजाने दुर्बळ घटकांचे रक्षण करावे, त्यांना आधार द्यावा हे खरे. परंतु त्या सदराखाली समाजाने आळशी व अकार्यक्षम घटकांना संरक्षण द्यावे हे कोण मान्य करेल ? परंतु तसे घडत होते व आता तसे घडत राहणे अधिकाधिक अवघड होणार आहे, कारण ते परवडणार नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सतत प्रयत्न केले आहेत. नेहरूंच्या दूरदृष्टीमुळे भारतात, विज्ञान-तंत्रज्ञान-उद्योग या क्षेत्रांत बऱ्याचपैकी भक्कम असा पाया घातला गेला. आजचे 'आय.टी.रिव्होल्यूशन' त्यामुळेच शक्य झाले. तसेच पूर्वापारची कुटुंबपद्धती आणि सदाचाराचे बाळकडू अजूनही येथे तग धरून आहेत. ह्या दोन्हीच्या पाठबळावर भारत जागतिकीकरणापुढे खचून न जाता त्याचा फायदा घेऊन आपली छाप जगावर उमटवेल अशी मला आशा वाटते.


तब्बल ६५ वर्षांनी<br>
अखिल भारतीय साहित्य संमेलनाची<br>
पालखी सोलापूरात मुक्कामी येते आहे.<br>
त्यासाठी होणाऱ्या अध्यक्षपदाच्या लढतीत<br>
डॉ. निर्मलकुमार फडकुले<br>
आणि<br>
मारुती चितमपल्ली<br>
हे दोघे सोलापूरकर रसिकांचा कौल मागत आहेत.<br>
**त्यांना शुभेच्छा !**